नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०९/२०२५ ( बुधवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत रस्ते अपघाताला आळा बसविण्यासाठी बी.टी.एल.एस. — बेसिक ट्रॉमा लाईफ सपोर्ट या विशेष प्रशिक्षणाचे करण्यात आले आयोजन

सध्या वाढत्या रस्ते अपघाताचे प्रमाण लक्षात घेता प्राणांतिक अपघात तसेच गंभीर अपघाताला आळा बसविण्यासाठी मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस आणि सेव्ह लाईफ फाउंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने दिनांक १७/०९/२०२५ रोजी पोलीस भवन, पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण येथे **बी.टी.एल.एस. — बेसिक ट्रॉमा लाईफ सपोर्ट या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये जिल्हा वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण आणि २१ पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना** वाहतूक नियंत्रण, नियमन व अपघातास प्रतिबंध व अपघात घडल्यास अपघातातील वाहन चालक/प्रवासी/जखमी व्यक्तींना तात्काळ गोल्डन अवर मध्ये कशी मदत करायची याबाबत प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले. सदर प्रशिक्षणात प्रामुख्याने बेसीक ट्रॉमा लाईफ सपोर्ट प्रशिक्षण म्हणजे काय ? व त्याची आवश्यकता काय ? याबाबत सेव्ह लाईफ फाऊंडेशन चे श्री किशन सिंग आणि शिओम सिंग, यांनी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले यात प्रामुख्याने खालीलप्रमाणे मुदयांवर अंतर्भुत विषयावर प्रकाश टाकला.

प्रामुख्याने खालीलप्रमाणे मुदयांवर अंतर्भुत विषयावर प्रकाश टाकला.

१) Golden Hour Advantage

२) Systematic Approach

३) Prevent Complication

४) Bridge pre Hosp. & Hospital care

५) Confidence in emergency

६) Team Co-ordination.

सदर प्रशिक्षणाचे बोधवाक्य म्हणून प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांना जिवन रक्षक म्हणून घोषित करण्यात आले. त्याचप्रमाणे “ **Good samartian** ” या कायदयातील तरतुदीनुसार सदर प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन करुन अपघात समयी मदत करणा—या व्यक्तीस काय संरक्षण आहे व त्यांची अश्यावेळी जी मदत घ्यायची आहे, त्याबददल माहीती देण्यात आली

सदर प्रशिक्षण श्री अनील म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामिण यांच्या अध्यक्षतेखाली झाले असुन सदर प्रशिक्षणास श्रीमती वृष्ठी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारीख उमरेड विभाग, पोलीस निरिक्षक श्री वैभव जाधव ,प्रभारी अधिकारी, जिल्हा वाहतूक शाखा, नागपुर ग्रामीण, सहा.पोलीस निरिक्षक श्री नरेंद्र गौरखेडे, श्रीमती वैष्णवी, श्री अनिकेत साखरे, सेव्ह लाईफ फाऊंडेशन संस्था आणि ४० पोलीस अधिकारी आणि अंमलदार प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

**नागपुर ग्रामिण पोलीसांच्या वतीने जनसामन्यांना अवाहन करण्यात येते की, अपघात समयी निसंकोचपणे पोलीसांना तसेच अपघात ग्रस्त व्यक्तींना मदत करावी.**


TRAINING SESSION
on


TRAINING SESSION
on
BASIC TRAUMA LIFE SUPPORT


SaveLIFE
FOUNDATION
TRAINING SESSION
on
BASIC TRAUMA LIFE SUPPORT



# नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा — २०२५

दरवर्षीप्रमाणे नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलात मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १५/०९/२०२५ ते १७/०९/२०२५ पर्यंत जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा, नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालय मैदान टेकानाका, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. सलग तीन दिवस विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या असुन काही क्रीडा स्पर्धा क्रिडा संकुल, मानकापूर येथे सुद्धा घेण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये चार संघ क्रमांक १) मुख्यालय संघ, २) काटोल—सावनेर संघ, ३) नागपूर—उमरेड संघ आणि ४) रामटेक—कन्हान संघ असे संघ होते.

**दिनांक १५/०९/२०२५** रोजी,१००० मीटर धावणे (पुरूष), रीले १००X ४ , भालाफेक, व्हॉलीबॉल, गोळाफेक, थाळीफेक, खो—खो, फुटबॉल, कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. **दुसऱ्या दिवशी १६/०९/२०२५** रोजी ५ किलोमीटर धावणे, रिले ४०० X ४, लांब उडी, उंच उडी, तहेरी उडी (पुरूष), १५०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, कबड्डी अंतीम सामाना अशा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तिसऱ्या दिवशी **दिनांक १७/०९/२०२५** रोजी व्हॉलीबॉल, ८०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, हॉकी अशा स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. सदर स्पर्धेचा समारोप कार्यक्रम बहुउद्देशीय हॉल, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण जिल्हा येथे घेण्यात आला असून सदर क्रिडा स्पर्धेत **सर्वाधिक पदके मुख्यालय संघाला मिळाले** आहे. पोलीस अंमलदारांनी अनेक स्पर्धेत पदक पटकावले आहे. सर्व विजेत्यांना श्री अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले आहे.

**सदर समारोप कार्यक्रमात श्री अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री पराग पोटे, पोलीस उपाधीक्षक (गृह), सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर**

ग्रामीण जिल्हा, सर्व पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी अमलदार हजर होते.




विजेता संघ पोलीस मुख्यालय नागपुर ग्रमीण


मुख्यालय संघ


मुख्यालय संघ



## एनडीपीएस (अवैध अंमली पदार्थ) च्या गुन्हयातील मुख्य पुरवठादार आरोपीला केले अटक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक ०८/०९/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांनी पुरूषोत्तम लॉजचा मालक नामे **१) सचिन पुरूषोत्तम रोकडे, वय ३५ वर्ष,रा. एमआयडीसी चौक आणि २) मोहम्मद नियाज अंसारी, वय ३३ वर्ष,रा. नवी बस्ती टेका नाका नागपुर** यांच्या ताब्यातुन १.७० ग्रॅम अंमली पदार्थ एम.डी. जप्त करून त्यांचे वर गुन्हा नोंदवुन त्यांना अटक केली होती.सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना पोलीसांना त्यांना अंमली पदार्थ एम.डी चा पुरवाठा करणारे १) प्रज्वल विष्णुजी सरटकर रा. नागपुर आणि २) संकेत अजय बुगेवार रा नागपुर या आरोपीतांची नावे समजली. नमुद गुन्हयात पुरावा साखळी जोडुन कळमेश्वर पोलीसांनी गुप्त बातमीदाराच्या आधारे दिनांक १०/०९/२०२५ रोजी नमुद गुन्हयात अंमली पदार्थ पुरवठादार आरोपी नामे **प्रज्वल विष्णुजी सरटकर, वय २५ वर्षे, रा.दहीबाजार नागपुर** याला अटक केली होती. आरोपी प्रज्वल च्या घरझडतीमध्ये ९.६९ ग्रॅम अंमली पदार्थ एम.डी. मिळुन आला होता. आरोपी संकेत

बुगेवार हा तेव्हा पासुन मिळुन येत नव्हता. सदर गुन्हयात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे कसुन तपास करीत मुख्य अंमली पदार्थ पुरवठादार आरोपी नामे **संकेत अजय बुगेवार, वय २९ वर्षे, रा. अशिर्वाद नगर, नागपुर** याला आज दिनांक १७/०९/२०२५ रोजी वानाडोंगरी येथील ओयो हॉटेल मधुन ताब्यात घेतले. आरोपी संकेत बुगेवार हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी सुध्दा गणेशपेठ पोलीस स्टेशन येथे अवैध अंमलीपदार्थ संदर्भात गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

## २४ तासात मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड,५ मोटर सायकल जप्त , उमरेड पोलीसांची कामगिरी

**उमरेड पोलीस स्टेशन :—** तक्रारदार नामे अचल लामसोंगे रा. अडयाळवाले ले आउट उमरेड हे दिनांक १३/०९/२०२५ रोजी १४/०० वा. त्यांची निळया रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच. ४०/सि.पी./१०६५ ही त्याच्या राहत्या घरासमोर उभी करून मौजा कामठी येथे त्याच्या बहीनी कडे कार्यक्रमाला आपल्या परीवारासह गेले व दिनांक १५/०९/२०२५ रोजी सकाळी ०९/०० वा. आपल्या परीवारा सह घरी परत आले असता त्यांची वरील वर्णनाची गाडी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात ईसमांनी सदर गाडी चोरी करून घेवुन गेल्याच्या फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अप.क्र. ६८०/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात एक तपास पथक तयार करण्यात आले. नमुद पोलीस पथकाने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे दिनांक १६/०९/२०२५ रोजी आरोपी नामे **साहील प्रमोद बोबडे, रा. शिवापुर, ता.उमरेड, जि. नागपुर, ह.मु. आंबेडकर चौक कन्हाण** याला ताब्यात घेवुन याच्या ताब्यातुन गुन्हयात वर नमुद गुन्हयात चोरीस गेलेली निळया रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच.४० सि.पी. १०६५ किंमती २५,०००/—रुपये जप्त करण्यात आली. तसेच आरोपीस अधिक चौकशी केली असता त्याने नागपुर ग्रामीण आणि नागपुर शहर येथुन मोटर सायकल चोरी केल्याबाबत माहीती दिली. आरोपीच्या ताब्यातुन पोलीस स्टेशन कोराडी नागपुर शहर हददीतुन ०२ मोटार सायकल क्र. एम.एच. ४०बि. ए. ६४९५ किंमती २०,०००/—रुपये आणि मोटर सायकल एम.एच.४० क्यु.९७५५ किंमती १५,०००/—

रुपये, पोलीस स्टेशन खापा, नागपुर ग्रामिण हददीतुन ०१ मोटार सायकल क्र. एम.एच.४० ए. जी.५२२१ किंमती १५,०००/—रुपये तसेच अजुन एक  मोटार सायकल क्र. एम.एच. ४० बि. एस. ६९०८ किंमती २५,०००/—रुपये असा एकुण १,००,०००/—रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक १६/०९/२०२५ रोजी रामटेक पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नगरधन कडुन रामटेक च्या दिशेने विनापरवाना अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी रामटेक ते मौदा या रोडवर नाकाबंदी केली असता एक ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. ४० सी.ओ.०८८७ त्याला विनाक्रमांची ट्रॉली जोडुन असलेला ट्रॅक्टर मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक रमेश अन्टु फटिंग, वय ३६ वर्षे, रा. नगरधन ता. रामटेक, जि नागपुर याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव संजय बिच्छुलाल दमाहे, रा. चिचाळा, जि नागपुर हे असुन त्यांच्या सांगण्यावरून संग्रामपुर येथुन रेती भरून घेवुन जात असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. ४० सी.ओ.०८८७ ट्रॉलीसह किमती ७,००,००० /—रूपये व २) १.५ ब्रास रेती किंमती १०,५००/— रूपये आणि असा एकुण ७,१०,५००/रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, **अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १६/०९/२०२५ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा मालापुर

शिवारात,झाडाझुडपा मागे, काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १)प्रेमदास पुंडलिक पाटील, वय ३१ वर्ष, रा. येणीकोणी, ता नरखेड जि नागपुर २) राजकुमार धनराज गजबे, वय ३८ वर्ष, रा. नरखेड, ३) अनिल सिताराम कंगाले, वय २८ वर्ष, रा. येणीकोणी, ता नरखेड जि नागपुर, ४) संजीव संतोषराव धुर्वे, वय ३१ वर्ष, रा रा. येणीकोणी, ता नरखेड जि नागपुर, ५) अर्जुन जानरावजी सोमकुमार, वय ३५ वर्ष, रा. राजनी ता. काटोल हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम १२८५०/— रूपये, होंडा पॅशन प्रो मोटर सायकल क्रमांक एम एच ४० डब्ल्यू ०६२३ किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ५७८५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १६/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १७/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मरामाय नगर, अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच गळपुरा चौक, काटोल नाका येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने